**“वैशिष्ट्यपूर्ण” (ले.शि २२१७ १३०१) योजनेंतर्गत मंजूर केलेल्या रु.१.६३ कोटी निधीपैकी रु.१.२२ कोटी निधी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना वितरीत करण्याबाबत.**

**सिल्लोड नगरपरिषद, जि. छत्रपती संभाजीनगर**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२५/प्र.क्र.२६३(२)/नवि-१६ (ई-१४३३५७९)**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२**
**दिनांक :- २९ एप्रिल, २०२६**

**संदर्भ :-**

(१) नगर विकास, शासन निर्णय क्र:- धोरण-२०१७/प्र.क्र.१७१/नवि-१६, दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ व दिनांक ३० सप्टेंबर, २०२०.

(२) नगर विकास, शासन निर्णय क्र:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-५)/नवि-१६, दि. ३१ मार्च, २०२५.

(३) नगर विकास, शासन निर्णय क्र:-संकिर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-५)/नवि-१६, दि. ०४ एप्रिल, २०२५.

**प्रस्तावना :-**

राज्यातील नगरपरिषदांना वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान देण्यात येते. सदर योजनेचे सुधारीत निकष व मार्गदर्शक तत्वे संदर्भाधीन क्र.(१) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. **“वैशिष्ट्यपूर्ण”** योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात विविध नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजूर केलेला निधी टप्प्या-टप्प्याने वितरित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असून संदर्भाधीन क्र.(२) येथील शासन निर्णयान्वये विविध योजनांचा निधी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे आहरीत करण्यात आलेला असून संदर्भाधीन क्र.(३) येथील शासन पत्रान्वये आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडे वर्ग करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने सिल्लोड नगरपरिषदेस मंजूर केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने पुढील टप्प्यातील निधी जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

**सिल्लोड नगरपरिषद, जि. छत्रपती संभाजीनगर** करीता **“वैशिष्ट्यपूर्ण”** योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे **रक्कम रु.१.६३ कोटी** निधी मंजूर करण्यात आला असून त्यापैकी **रु.१.२२ कोटी (अक्षरी रक्कम रु. एक कोटी बावीस लक्ष मात्र)** इतक्या निधीचा पुढील टप्पा नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावर आहरीत करण्यात आलेल्या निधीतून जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयानुसार वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता संदर्भाधीन क्र. (३) येथील शासन पत्रानुसार तत्कालीन परिस्थितीत निधी आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन

संचालनालयाकडे वर्ग करण्यात आले होते. तथापि, प्रशासकीय सोईकरीता या शासन निर्णयानुसार मंजूर व वितरीत करण्यात येत असलेल्या निधी करीता जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांना नियंत्रक अधिकारी, तसेच जिल्हा सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना यापुढे आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सहआयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई /सहाय्यक आयुक्त (लेखा), नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांनी या शासन निर्णयामध्ये नमूद केलेला निधी तात्काळ जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर/ जिल्हा सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे सपूर्द करावा. तसेच जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर/ जिल्हा सह आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांनी सदरचा निधी संबंधीत कार्यान्वयन यंत्रणेस वितरीत करावा.

३. सदर निधी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक ६ जून, २००८ मधील तरतुदीप्रमाणे खर्च करणे बंधनकारक राहील. सदर निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ करिता वितरीत करण्यात येणाऱ्या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

४. आहरण व संवितरण अधिकाऱ्याने सदरचे आहरीत करण्यात येणारे अनुदान तात्काळ संबधितास वितरीत करावे. सदर निधी वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक:-संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून,२००८ मधील तरतुदीप्रमाणे खर्ची पडेल याची दक्षता घ्यावी. निधी खर्च करण्याची मूदत संपल्यानंतर अखर्चित निधी संबधितांनी व्याजासह शासनाच्या खाती तात्काळ जमा करावा.

५. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

६. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा. सदरचा निधी जिल्हाधिकारी यांनी इतरत्र थेट वळता करू नये.

७. सदर निधी कामावर खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

८. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे या लेखाशिर्षाखाली यापुर्वी वितरीत केलेला निधी अखर्चित असल्यास, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१०१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५, शासन निर्णय क्रमांक :

संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय दिनांक ६ जून, २००८ व शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-१०.२१/प्र.क्र.६३/अर्थोपाय दिनांक २८ ऑक्टोबर, २०२५ अन्वये कार्यवाही करावी.

**९.** संदर्भाधीन क्र (१) ते (३) येथील तसेच परिशिष्टातील नमूद शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

**१०.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२९१७०६३१३३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.04.29 17:07:52 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुध्दे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयाचे अपर मुख्य सचिव मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास व औकाफ) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,बेलापूर भवन, ७ वा मजला, बेलापूर सी.बी.डी., नवी मुंबई - ४०० ६१४.
६. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.
७. जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर.
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.
९. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
११. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१३. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे/ रत्नागिरी.
१४. जिल्हा सह आयुक्त/ नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.
१५. मुख्याधिकारी, सिल्लोड नगरपरिषद, जि. छत्रपती संभाजीनगर.
१६. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१७. कार्यासन (नवि-४), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांक:-नपावै-२०२५/प्र.क्र.२६३(२)/नवि-१६ (ई-१४३३५७९)
## दिनांक :- २९ एप्रिल, २०२६ सोबतचे परिशिष्ट

*(रक्कम रु. लक्ष)*

| *अ.क्र.* | *जिल्हा* | *स्थानिक स्वराज्य संस्था* | *शासन निर्णय क्रमांक* | *दिनांक* | *मंजूर रक्कम रु. (लक्ष)* | *या आदेशान्वये वितरीत करावयाची रक्कम (रु. लक्ष)* | *जिल्हा निहाय निधी वितरीत रक्कम (रु. लक्ष)* |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | छत्रपती संभाजीनगर | सिल्लोड | नपावै-२०२५/प्र.क्र.४१(२)/नवि-१६ (ई-९६०८८७) | १३.१०.२०२५ | १६३.०० | १२२.०० | १२२.०० |
| | | | | एकूण रक्कम रु. (लक्ष) | **१६३.००** | **१२२.००** | **१२२.००** |